# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं *dydepune@gmail.com*

वेब साईट क्रमांक ***www.dydepune.com***


जा.क्र./उमाशि-२/संमा/शिबिर/पुवि/२०१४/20020

दि :- ३०/८/२०१४

30 AUG 2014

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये
वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये
पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.

संदर्भ :- १) या कार्यालयाकडील परिपत्रक समक्रमांक १९३२५ दिनांक १/८/२०१४
२) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक १९८०४ दिनांक २२/८/२०१४

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता शिबिर दिनांक २५/८/२०१४ ते १८/१०/२०१४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले होते. दिनांक ५ सप्टेंबर २०१४ रोजी राज्य शिक्षक पुरस्कार समारंभ होणार असून त्याचे संपूर्ण नियोजनाची जबाबदारी हया वर्षी पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१ या कार्यालयाकडे देण्यात आलेली आहे. त्यामुळे दिनांक २५/०८/२०१४ ते ०६/०९/२०१४ या कालावधीतील सोलापूर जिल्हयाचे शिबीर तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात येत असून **दिनांक १०/०९/२०१४ पासून होणारे पुढील शिबीर नियोजित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे होईल. याची सर्वांनी नोंद घेण्यात यावी.**

दरवर्षी प्रमाणे ऑनलाईन पटपडताळणीची माहिती भरण्यास यावर्षी वेबसाईट काही तांत्रिक कारणाने विहीत वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही. तरी सदर वेबसाईट दिनांक ०५/०९/२०१४ नंतर सुरु होईल. त्याप्रमाणे पटपडताळणीची माहिती भरण्यात यावी. पंढरपूर व सोलापूर येथील नियोजित दिनांक <u>२५/८/२०१४ ते ०६/०९/२०१४</u> या कालावधीच्या शिबीराचे सुधारीत वेळापत्रक यथावकाश कळविण्यात येईल. तरी कृपया सर्व मूख्याध्यापक /प्राचार्य यांनी त्याची नोंद घ्यावी.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत माहितीसाठी-:

१. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १. यांना माहितीस्तव सविनय सादर.

माहिती व कार्यवाहीसाठी :-

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर / अहमदनगर